दै. महाराष्ट्र टाईम्स
बुधवार दि. ३० मे २०१८

कुराण,'
ही

शिवरायांनी वाढविलेले आरमार

परंपरा आरमाराची भाग ६

अनिकेत यादव

बालमित्रांनो, मागील भागात आपण पाहिलं, की संपूर्ण हिंदी महासागर व भारताची सागरी किनारपट्टी युरोपीयनांच्या घशात गेलेली असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःचं लढाऊ आरमार उभं करण्याचं ठरवलं. मात्र, त्यास परकीय युरोपीय लोकांचा विरोध होता. कारण लढाऊ जहाजं समुद्रात आणण्यास त्या वेळी परवानगी नसायची आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे लढाऊ जहाजं उभारण्याकरिता लागणारं तंत्रज्ञान आपल्याकडं नव्हतं. मग शिवरायांनी पोर्तुगीज कारागीर आपल्याकडे कामावर ठेवून, त्यांच्या हाताखाली आपली हरहुन्नरी माणसं देऊन जहाजांची बांधणी केली. सिद्दीशी मुकाबला करण्यासाठी आपण ही जहाजं बांधत आहोत, असं शिवरायांनी सांगितलं. परंतु ही जहाजं भविष्यात आपल्याविरोधात वापरली जातील, या भीतीनं गोव्याच्या पोर्तुगीज गव्हर्नरनं शिवरायांकडे कामाला असणाऱ्या पोर्तुगीज कारागिरांना पत्र लिहून, ते काम थांबवून कामावरून निघून जाण्यास सांगितलं. पोर्तुगीज कारागिरांना जास्तीत जास्त पगार देऊनदेखील, केवळ राष्ट्रप्रेमापोटी त्या कारागिरांनी मोठ्या पगाराच्या नोकरीवर पाणी सोडलं. मात्र, त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या मराठी कारागिरांनी ते काम पुढं जोमानं पूर्णत्वास नेलं. इ. स. १६५७ मध्ये मराठ्यांच्या जहाजबांधणीचं काम सुरू झालं आणि अवघ्या आठ वर्षांतच म्हणजे फेब्रुवारी १६६५ मधल्या बसरूर येथील आरमारी मोहिमेत ८५ छोटी जहाजं व तीन मोठ्या जहाजांनी भाग घेतला होता. म्हणजे एवढ्या जहाजांची निर्मिती केवळ आठ वर्षांमध्येच करण्यात आली.

बसरूरची आरमारी मोहीम ही भारताच्या नाविक परंपरमध्ये मैलाचा दगड ठरली आहे; कारण स्वतः राजानं नेतृत्व करून, जहाजांमार्गे जाऊन तीन बलाढ्य शत्रुराष्ट्रांच्या पलीकडे असणाऱ्या मुलखावर आक्रमण करून तेथील बाजारपेठ काबीज करणं, मुलूख हस्तगत करणं आणि तेही आजच्यासारखी कोणतीही संसाधनं नसताना, ही विशेष गोष्ट होती. मात्र, हे सर्व करून शिवाजी महाराजांनी ही मोहीम फत्ते केली.

हजारो वर्षांची परंपरा असणाऱ्या युरोपीय आरमारांपेक्षा शस्त्रास्त्रे व शास्त्रीय ज्ञान याबाबतीत मराठा आरमार कनिष्ठ दर्जाचं होतं. इ. स. १६५७ मध्ये आरमाराची स्थापना केल्यानंतर केवळ आठ वर्षांमध्ये एवढी मोठी सागरी मोहीम आखायची, म्हणजे धाडसच म्हटलं पाहिजे. या मोहिमेमुळे समुद्री परीक्षेत नव्यानं स्थापित झालेलं मराठा आरमार मोठ्या गुणसंख्येनं उत्तीर्ण झालं, हे निश्चित. कारण मराठा आरमाराचा धुव्वा उडविण्याची भाषा बोलणारे इंग्रज-पोर्तुगीज नंतर मराठ्यांशी सलोख्याची बोलणी करू लागले.

महाराजांनी समुद्री व्यापाराला व सावकारांनादेखील बरेचसे प्रोत्साहन दिले. त्यामुळे त्यांनी पोर्तुगीज, इंग्रज, डच यांच्याशी स्नेहाचे संबंध ठेवले. त्यांच्यावर वचक ठेवला; मात्र त्यांना दुखवू दिले नाही. आपल्या काही लोकांना त्यांनी परदेशात समुद्री व्यापार करण्यासाठीही पाठविले.

टाइम

ना,
पाठीम
म्हणजे आ
सतत काही त
केव्हा आपली आई ब
किंवा काही गोष्टी घरात
भात, आमटी, भाजी, पोळ
ही यादी कितीही मोठी ह
तुम्हाला माहितीय का? य
ते कसे होतात हे तुम्हाला
असंच असेल. मग या सुट्टीत
आपल्या आजी किंवा आईसोब
येईल. मसाल्याचा डबा म्हणजे का
औषधी गुणधर्म आहेत का? मीठ, चह